# प्रेसनोट

दि.१५/१०/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आरोपी क्र.१ हबीब बाबुभाई सय्यद, वय–५२ वर्ष, धंदा–शेती व खाजगी एजंट<br>आरोपी क्र.२ शकिल अब्बास पठाण,वय–४३ वर्ष,धंदा–शेती व रजिस्ट्रार कार्यालय, राहुरी येथे एजंट, दोघे रा.महादेववाडी, मु.पो.सडे, ता.राहुरी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/– तडजोड अंती रुपये ८०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४०,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी अहमदनगर येथील जात पडताळणी कार्यालयात, तिन इसमांनी खोटे जातीचे दाखले काढुन जात वैधता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला असलेने त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येऊ नये या करीता दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने लावून देणे करीता आरोपी क्र.१ हबीब बाबुभाई सय्यद, वय–५२ वर्ष, धंदा–शेती व खाजगी एजंट याने तक्रारदार यांचेकडे जात पडताळणी कार्यालय, अहमदनगर येथील अधिकारी यांना १,००,०००/– रुपये द्यावे लागतील असे सांगुन एक लाख रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिलेल्या तक्रारीवरुन दि.१३/१०/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी क्र.१ हबीब बाबुभाई सय्यद याने पंचासमक्ष तक्रारदार यांना १,००,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोड अंती ८०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी अर्धी रक्कम दिनांक १५/१०/२०२१ रोजी स्विकारण्याचे मान्य केले.<br>आज दि.१५/१०/२०२१ रोजी हॉटेल नितीन, स्टेशन रोड, राहुरी येथे आयोजित केलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.१ हबीब बाबुभाई सय्यद याने सदरची लाच रक्कम रुपये ४०,०००/– तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष स्विकारुन आरोपी क्र.२ शकिल अब्बास पठाण यांचेकडे दिली असता दोन्ही आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत त्यांचेविरुध्द राहुरी पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर